## महाराष्ट्र शासन
## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

सत्यमेव जयते

कौशल्यम् बलम्



**श्री. नरेन्द्र मोदी**
मा. पंतप्रधान



**श्री. एकनाथ शिंदे**
मा. मुख्यमंत्री



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. उपमुख्यमंत्री



**श्री. अजित पवार**
मा. उपमुख्यमंत्री



**श्री. मंगल प्रभात लोढा**
मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता



**श्रीमती आदिती तटकरे**
मा. मंत्री, महिला व बालविकास



# राजमाता जिजाऊ
## युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम

आयोजक: महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन

सहयोगी संस्था: भारतीय स्त्री शक्ति, विद्यार्थी निधी ट्रस्ट व राज्यातील सर्व विद्यापीठे

# संकेतस्थळ वापरकर्ता पुस्तिका
आवृत्ती २, दि.०३.०८.२०२३

**महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ**
४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी,
मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
https://msbsvet.edu.in ; msbve.secretary@dvet.gov.in ; ०८६५५९४४८५१/५२/५३

# अनुक्रमणिका

१ राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम ........ २
२ महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ ........ ३
३ मुख्यपृष्ठ (Home Page) ........ ३

उमेदवार/ Candidate ........ ४
४ उमेदवार > उमेदवार नोंदणी/ Candidate > Candidate Registration ........ ४
५ उमेदवार > उमेदवार लॉगिन/ Candidate > Candidate Login ........ ५

संस्था/ Institute ........ ७
६ संस्था > संस्था नोंदणी/ Institute > Institute Registration ........ ७
७ संस्था > संस्था लॉगिन/ Institute > Institute Login ........ ९
८ नविन बॅच तयार करणे/ Create New Batch ........ १०
९ उमेदवारांचे प्रवेश निश्चित करणे/ Admit Candidates ........ १०
१० प्रशिक्षण पूर्ण करुन प्रमाणपत्रासाठी बॅच अग्रेषित करणे ........ ११
११ प्रमाणपत्र download करणे ........ १२
१२ उमेदवारांची यादी ........ १२

जिल्हा प्रशासक/ District Admin ........ १३
१३ प्रथम लॉगिन करणे ........ १३
१४ खात्यात प्रवेश करणे ........ १३
१५ बॅचेस/ Batches: ........ १४
१६ प्रमाणपत्र निर्गमित करण्यास मान्यता देणे ........ १४
१७ प्रमाणपत्र download करणे ........ १५
१८ छापिल प्रमाणपत्र वितरण स्थिती ........ १६
१९ उमेदवारांची यादी ........ १६
२० नानविध/ Miscellaneous ........ १६

इतर सुविधा ........ १६
२१ उमेदवार व संस्था पासवर्ड विसरल्यास करावयाची कार्यवाही/ Forgot Password ........ १६
२२ उमेदवार व संस्था नोंदणी क्रमांक विसरल्यास करावयाची कार्यवाही/ Forgot Profile ID ........ १८
२३ खात्याच्या बाहेर येणे/ Sign Out ........ १८

## १ राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम

महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वात जास्त शहरीकरण झालेले राज्य आहे. तसेच बदलत्या काळानुसार महिलांच्या बदललेल्या समस्या व त्यावर कराव्या लागणाऱ्या उपाययोजना करण्याकरिता शासनस्तरावरुन नियोजन करणे अत्यावश्यक बाब झालेली आहे. अलीकडील काळात महिला व मुलींवर होणारे क्रुर हिंसाचार हे शासन व समाजासमोरील आव्हान ठरत आहे. त्यास आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

राज्यातिल युवतींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी व त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाव्दारे शासन निर्णय दि.२३.०६.२०२३ अन्वये राज्यात राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम दि.०३.०७.२०२३ पासुन राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या अधिपत्याखालील महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था या स्वायत्त संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. याकरिता राज्यातिल शैक्षणिक संस्था/ विद्यापिठे, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी संघटना/ गट इ. यांचे सहकार्य घेण्यात येत आहे.

प्रशिक्षण दोन टप्प्यात देण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात युवतींचे समुपदेशन करण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये प्रत्येकी २० प्रशिक्षकांव्दारे १००० युवतींना दोन दिवसीय स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणांती युवतींना महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाव्दारे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.

सदर प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या संस्था व युवतींना ऑनलाईन नोंदणी करण्याची सुविधा https://shakti.msbsvet.edu.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. संस्थांसाठी तुकडी निर्माण करणे, प्रशिक्षण नियोजन, प्रशिक्षण पूर्ण करणे, इत्यादी सर्व सुविधा तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांसाठी प्रशिक्षण तुकडी मान्यता देणे व प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंबंधीची सर्व सुविधा सदर संकेतस्थळावर ऑनलाईन माध्यमातुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याकरिता युवती, संस्था व जिल्हा कार्यालयांनी सदर संकेतस्थळावर देण्यात आलेली वापरकर्ता पुस्तिका उभ्यासावी.







दि.०३ जून, २०२३ रोजी गुरूपौर्णिमेचे औचित्य साधुन मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचा श्री. मंगल प्रभात लोढा, मा. मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रातिनिधिक स्वरूपात शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी केरला स्टोरी चित्रपटातिल अभिनेत्री श्रीमती आदिती शर्मा; डॉ. अनुपकुमार यादव, मा. सचिव, महिला व बालविकास विभाग; डॉ. इंदू जाखड, व्यवस्थापकीय संचालक, महिला व आर्थिक विकास महामंडळ व श्री. राहुल मोरे, आयुक्त, महिला व बालविकास विभाग उपस्थित होते. या कार्यक्रमात मुंबई विद्यापीठ व एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या २०० विद्यार्थीनींनी सहभाग घेऊन प्रशिक्षण घेतले.

## २ महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

२.१ सन १९५६ मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची (Maharashtra State Board of Technical Education - MSBTE) स्थापना करण्यात आली होती. सदर मंडळाव्दारे राज्यामध्ये तांत्रिक व व्यवसाय अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत होती. तथापि, दरम्यानच्या काळात तांत्रिक व व्यवसाय प्रशिक्षणाची व्याप्ती वाढल्याने व औद्योगिकीकरणातील वाढ, बदलते तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक बदल या बाबींचा विचार करता अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी तसेच विशिष्ट शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अल्प कालावधीचे व्यावसायिक अभ्यासक्रम तयार करुन अशा विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारास चालना देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या व्यवसाय शिक्षणाची गरज भागविण्यासाठी शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय दि.२३.०१.१९८६ अन्वये महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे विभाजन करुन महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाची (Maharashtra State Board of Vocational Education - MSBVE) स्थापना करण्यात आली.

२.२ राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा यानुसार कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता शिक्षण व महाराष्ट्र राज्यातील इतर कौशल्य पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींचे नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक इतर बाबींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळाचे नामांतरण करुन "महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ" स्थापन करण्यासाठी व विधीसंस्थापित करण्यासाठी "महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१ (सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९)" दि.२०.०१.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला. सदर अधिनियमाची दि.२६.०१.२०२२ पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे.

२.३ मंडळाचे प्रमुख कार्ये खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आले आहेत.

२.३.१ व्यवसाय अभ्यासक्रमांना मान्यता देणे (Course approval)

२.३.२ कौशल्य प्रशिक्षण संस्थांना संलग्नता देणे (Institute Affiliation)

२.३.३ कौशल्य चाचणी (Assessment) व प्रमाणीकरण (Certification)


२.३.४ प्रशिक्षण व्यवस्थापन, संशोधन व विकास (Training Management, Research and Development)

२.४ मंडळाने संलग्नता दिलेल्या १२६५ संस्थांमध्ये मंडळाचे काही तासांपासुन, सहा महिने, एक वर्ष व दोन वर्ष कालावधीचे अर्धवेळ व पूर्णवेळ असे ३६५ पदविका (Diploma), प्रगत पदविका (Advance Diploma) व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांत (Certificate Course) प्रशिक्षण देण्यात येत आहे. सर्व Sector Skill Council यांचे २२००+ NSQF अभ्यासक्रम मंडळाने स्विकृत (Adopt) केले आहेत.

२.५ मंडळासंबंधी अधिक माहिती मंडळाचे संकेतस्थळ https://msbsvet.edu.in वर उपलब्ध आहे.

## ३ मुख्यपृष्ठ (Home Page)

३.१ संकेतस्थळ https://shakti.msbsvet.edu.in



३.२ English/ मराठी: संकेतस्थळाची भाषा बदलणे

३.३ हेल्पलाइन/ Helpline: संकेतस्थळ वापरण्याबाबत मदत कक्ष संपर्क क्रमांक

३.४ मुख्यपृष्ठ/ Home: मुख्यपृष्ठावर येण्याकरिता

३.५ उमेदवार/ Candidate:

- ३.५.१ उमेदवार नोंदणी/ Candidate Registration: नवीन उमेदवार नोंदणी करणे
- ३.५.२ उमेदवार लॉगिन/ Candidate Login: नोंदणीकृत उमेदवारांच्या खात्यात प्रवेश करणे

३.६ संस्था/ Institute:

- ३.६.१ संस्था नोंदणी/ Institute Registration: नवीन संस्था नोंदणी
- ३.६.२ संस्था लॉगिन/ Institute Login: नोंदणीकृत संस्थांच्या खात्यात प्रवेश करणे

३.७ जिल्हा प्रशासक/ District Admin: जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांच्या खात्यात प्रवेश करणे

३.८ राज्य प्रशासक/ State Admin: राज्य प्रशासकांच्या खात्यात प्रवेश करणे

३.९ नोंदणीकृत युवती/ Registered Girls: नोंदणीकृत युवतींची संख्या

३.१० प्रशिक्षित युवती/ Completed Training: प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवतींची संख्या

३.११ नोंदणीकृत संस्था/ Registered Institutes: नोंदणीकृत संस्थांची संख्या

३.१२ प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत/ About Training Program: प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती

३.१३ संबंधीत व्हिडिओ/ Related Videos: मान्यवरांचे संदेश व प्रशिक्षण कार्यक्रमासंबंधी व्हिडिओ

३.१४ संबंधीत प्रकाशने/ Related Publications: प्रशिक्षण कार्यक्रमासंबंधी दस्तऐवज व प्रकाशने

## उमेदवार/ Candidate


## ४ उमेदवार > उमेदवार नोंदणी/ Candidate > Candidate Registration

४.१ राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नोंदणी करण्याकरिता उमेदवार > उमेदवार नोंदणी वर क्लिक करावे.




४.२ उमेदवार नोंदणी अर्जातिल सर्व माहिती केवळ इंग्रजी भाषेतच भरावी. अन्य भाषेत भरलेली माहिती ऑनलाईन प्रणालीमध्ये नोंदविली जाणे (Save) तांत्रिकदृष्ट्या शक्य होणार नाही.

४.३ उमेदवार नोंदणी अर्ज खालील प्रमाणे प्रकट होईल:



४.३.१ शीर्षक/ Title: शीर्षक निवडावे

४.३.२ पहिले नाव/ First Name: पहिले नाव नमुद करावे

४.३.३ मधले/वडील/पतीचे नाव/ Middle/ Father/ Husband Name: मधले नाव नमुद करावे

४.३.४ आडनाव/ Last/ Surname: आडनाव नमुद करावे

४.३.५ जन्मतारीख/ Date of Birth: जन्म तारीख नमुद करावी

४.३.६ लिंग/ Gender: लिंग निवडावे

४.३.७ ई - मेल आयडी/ E-Mail ID: ई-मेल आयडी नमुद करावा

४.३.८ प्राथमिक मोबाईल क्रमांक/ Primary Mobile Number: प्राथमिक मोबाईल क्रमांक नमुद करुन One Time Password व्दारे पुष्टी करावी. उमेदवारास सर्व माहिती या मोबाईल क्रमांकावर SMS व्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

४.३.९ दुय्यम मोबाईल क्रमांक/ Secondary Mobile Number: दुय्यम मोबाईल क्रमांक असल्यास नमुद करावा

४.३.१० राज्य/ State: ज्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहात तेथील राज्य निवडावे

४.३.११ जिल्हा/ District: ज्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहात तेथील जिल्हा निवडावा

४.३.१२ तालुका/ Taluka: ज्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहात तेथील तालुका निवडावा

४.३.१३ संस्थेचे नाव/ Name of Institute: निवड केलेल्या तालुक्यात ज्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहात ती संस्था निवडावी. आपली संस्था दिसत नसल्यास संबंधीत संस्थेस नोंदणी करण्यास कळवावे. ज्या संस्थांनी सदर संकेतस्थळावर नोंदणी केली आहे, त्याच संस्थांची नावे सदर रकान्यात उपलब्ध असतील.

४.३.१४ पात्रता प्रकार/ Qualification Type: शैक्षणीक पात्रता निवडावी

४.३.१५ इयत्ता/वर्ष/ Standard/ Year: शिक्षण घेत असलेले वर्ष निवडावे

४.३.१६ पदवीचे नाव/ Name of Degree: पदवीचे नाव नमुद करावे

४.३.१७ विषय/ प्रवाह/ शाखा/ व्यापार/ स्पेशलायझेशन/ Subject/ Stream/ Branch/ Trade/ Specialization: शैक्षणीक पात्रतेचा विषय नमुद करावा

४.३.१८ सुरक्षा प्रश्न/ Security Question: सुरक्षा प्रश्न निवडावा. पासवर्ड विसरल्यास या प्रश्नाव्दारे पासवर्ड पुनर्स्थापित करता येईल

४.३.१९ सुरक्षा प्रश्नाचे उत्तर/ Security Question॰s Answer: सुरक्षा प्रश्नाचे उत्तर नमुद करावे


४.३.२० पासवर्ड/ Password: पासवर्ड तयार करावा. पासवर्डमध्ये १ कॅपिटल अल्फाबेट, १ नंबर आणि १ स्पेशल कॅरेक्टर सह किमान ८ वर्ण आणि कमाल १५ वर्ण असावेत

४.३.२१ पासवर्डची पुष्टी करा/ Confirm Password: पासवर्डची पुष्टी करावी

४.३.२२ Captcha: दिलेला सांकेतांक नमुद करावा

४.३.२३ नोंदणी करा/ Register: सर्व भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुन नोंदणी निश्चित करावी

४.४ उमेदवाराची नोंदणी पूर्ण होईल व उमेदवार नोंदणी क्रमांक उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवार नोंदणी क्रमांक व पासवर्ड उमेदवाराच्या प्राथमिक मोबाईल क्रमांकावर SMS व्दारे देखिल उपलब्ध करुन देण्यात येईल.





## ५ उमेदवार > उमेदवार लॉगिन/ Candidate > Candidate Login

५.१ नोंदणीकृत उमेदवारांनी त्यांच्या खात्यात प्रवेश करण्यासाठी उमेदवार > उमेदवार लॉगिन वर क्लिक करावे.

५.२ उमेदवार नोंदणी क्रमांक, पासवर्ड व सांकेतांक नमुद करुन “लॉगिन” वर क्लिक करावे.




५.३ खालील प्रमाणे उमेदवाराचे खाते प्रकट होईल:




५.४ डॅशबोर्ड/ Dashboard: याव्दारे उमेदवारास आपल्या खात्याच्या मुख्यपृष्ठावर येता येईल. उमेदवाराच्या प्रशिक्षणाची सद्यस्थिती/ Candidate Status उपलब्ध असेल.

५.५ प्रोफाईल/ Profile

५.५.१ प्रोफाईल संपादित करा/ Edit Profile: याव्दारे उमेदवारास आपल्या नोंदणी अर्जातील माहितीत बदल करता येईल. तथापि, प्रमाणपत्र निर्गमित झाल्यावर प्रोफाईल मधील माहितीत बदल करता येणार नाही.

५.५.२ प्रोफाईल प्रिंट/ Print Profile: याव्दारे उमेदवारास आपल्या नोंदणी अर्जाची छापिल प्रत उपलब्ध करुन घेता येईल.


५.६ नानाविध/ Miscellaneous

५.६.१ सुरक्षा प्रश्न बदला/ Change Security Question: उमेदवारास सुरक्षा प्रश्न बदलता येईल

५.६.२ पासवर्ड बदला/ Change Password: उमेदवारास पासवर्ड बदलता येईल

५.७ परीक्षा

५.७.१ निकाल व प्रमाणपत्र/ Result and Certificate: प्रशिक्षणांती ऑनलाईन प्रमाणपत्र येथे उपलब्ध करुन देण्यात येईल. Download वर क्लिक करुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.





५.७.२ महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाव्दारे छापिल प्रमाणपत्र संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत संबंधीत संस्थेस उपलब्ध करुन देण्यात येतील. मंडळाने प्रमाणपत्र वितरित केल्याचा दिनांक “Printed Certificate Dispatch Date” मध्ये नमुद करण्यात येईल.

## संस्था/ Institute

### ६ संस्था > संस्था नोंदणी/ Institute > Institute Registration


६.१ राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्याकरिता संस्थांनी संस्था > संस्था नोंदणी वर क्लिक करावे.




६.२ संस्था नोंदणी अर्जातिल सर्व माहिती केवळ इंग्रजी भाषेतच भरावी. अन्य भाषेत भरलेली माहिती ऑनलाईन प्रणालीमध्ये नोंदविली जाणे (Save) तांत्रिकदृष्ट्या शक्य होणार नाही.

६.३ संस्था नोंदणी अर्ज खालील प्रमाणे २ भागात प्रकट होईल:

६.४ अधिकृत प्रतिनिधी तपशील/ Authorized Representative Details: संस्थेची नोंदणी करणे व संकेतस्थळ वापरण्याकरिता संस्थेने त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नियुक्त करावे. सदर अधिकृत प्रतिनिधी संकेतस्थळाव्दारे सर्व कार्यवाही करण्यास अधिकृत असतील. नोंदणी अर्जाच्या पहिल्या भागात अधिकृत प्रतिनिधी तपशील खालील प्रमाणे नोंदवावा:




६.४.१ शीर्षक/ Title: शीर्षक निवडावे

६.४.२ पहिले नाव/ First Name: पहिले नाव नमुद करावे

६.४.३ मधले/वडील/पतीचे नाव/ Middle/ Father/ Husband Name: मधले नाव नमुद करावे

६.४.४ आडनाव/ Last/ Surname: आडनाव नमुद करावे

६.४.५ लिंग/ Gender: लिंग निवडावे

६.४.६ जन्मतारीख/ Date of Birth: जन्म तारीख नमुद करावी


६.४.७ संस्थेत पद/ Designation in Institute: संस्थेत धारण केलेले पद नमुद करावे

६.४.८ प्राथमिक मोबाईल क्रमांक/ Primary Mobile Number: प्राथमिक मोबाईल क्रमांक नमुद करुन One Time Password व्दारे पुष्टी करावी. अधिकृत प्रतिनिधीस सर्व माहिती या मोबाईल क्रमांकावर SMS व्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

६.४.९ दुय्यम मोबाईल क्रमांक/ Secondary Mobile Number: दुय्यम मोबाईल क्रमांक असल्यास नमुद करावा

६.४.१० ई - मेल आयडी/ E-Mail ID: ई-मेल आयडी नमुद करावा

६.५ संस्था नोंदणी/ Institute Registration: दुसऱ्या भागात संस्थेची माहिती खालील प्रमाणे सादर करावी:


संस्था नोंदणी

संस्थेचे नाव *
JAIHIND COLLEGE

पत्ता *
SAVARKAR MARG

राज्य *
Maharashtra

जिल्हा *
Dhule

तालुका *
Shirpur

शहर / गाव *
Shirpur-Warwade (M Cl)

पिन कोड *
424002

विद्यापीठ/ मंडळाचे नाव ज्याशी संलग्न *
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY

फोन नंबर
+91 0222623563

ईमेल *
jaihind@yahoo.com

सुरक्षा प्रश्न *
Which is your favourite game ?

सुरक्षा प्रश्नाचे उत्तर *
FOOTBALL

पासवर्ड *
••••••••

पासवर्डची पुष्टी करा *
••••••••

टीप : पासवर्डमध्ये 1 कॅपिटल अल्फाबेट, 1 नंबर आणि 1 स्पेशल कॅरेक्टर सह किमान 8 वर्ण आणि कमाल 15 वर्ण असावेत.

DJAKZ
DJ AKZ

नोंदणी संस्था
रीसेट करा

६.५.१ संस्थेचे नाव/ Name of Institute: संस्थेचे संपूर्ण नाव नमुद करावे. संबंधीत विद्यापिठ/ मंडळाकडे संस्थेचे नोंदणीकृत नावच नोंदवावे


६.५.२ पत्ता/ Address: संस्थेचा संपूर्ण पत्ता नमुद करावा. सदर पत्त्यावर प्रमाणपत्र पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार असल्याने संपूर्ण पत्ता नमुद करणे आवश्यक आहे.

६.५.३ राज्य/ State: संस्था जेथे कार्यरत आहे तेथील राज्य निवडावे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात केवळ महाराष्ट्र राज्यात स्थित संस्थाच पात्र आहेत.

६.५.४ जिल्हा/ District: संस्था जेथे कार्यरत आहे तेथील जिल्हा निवडावे

६.५.५ तालुका/ Taluka: संस्था जेथे कार्यरत आहे तेथील तालुका निवडावे

६.५.६ शहर/ गाव/ City/ Village: संस्था जेथे कार्यरत आहे तेथील शहर/ गाव निवडावे. आपल्या शहर/ गावाचे नाव ड्रॉप डाऊन मध्ये उपलब्ध नसल्यास “Other” निवडावे व पुढील रकान्यात शहर/ गावाचे नाव नमुद करावे.


शहर / गाव *
Other
शहर / गाव *

६.५.७ पिन कोड/ Pin Code: पिन कोड नमुद करावा

६.५.८ संस्था/ विद्यापिठ ज्यास संलग्न आहे/ University/ Board Name Affiliated to: संस्था ज्या विद्यापिठ अथवा मंडळास संलग्न आहे त्याचे संपुर्ण नाव नमुद करावे

६.५.९ दुरध्वनी क्रमांक/ Phone Number: संस्थेचा दुरध्वनी क्रमांक नमुद करावा

६.५.१० ई - मेल आयडी/ E-Mail ID: संस्थेचा ई-मेल आयडी नमुद करावा

६.५.११ सुरक्षा प्रश्न/ Security Question: सुरक्षा प्रश्न निवडावा. पासवर्ड विसरल्यास या प्रश्नाव्दारे पासवर्ड पुनर्स्थापित करता येईल

६.५.१२ सुरक्षा प्रश्नाचे उत्तर/ Security Question॰s Answer: सुरक्षा प्रश्नाचे उत्तर नमुद करावे.


६.५.१३ पासवर्ड/ Password: पासवर्ड तयार करावा. पासवर्डमध्ये १ कॅपिटल अल्फाबेट, १ नंबर आणि १ स्पेशल कॅरेक्टर सह किमान ८ वर्ण आणि कमाल १५ वर्ण असावेत

६.५.१४ पासवर्डची पुष्टी करा/ Confirm Password: पासवर्डची पुष्टी करावी


६.५.१५ Captcha: दिलेला सांकेतांक नमुद करावा

६.५.१६ संस्था नोंदणी करा/ Register Institute: सर्व भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुन नोंदणी निश्चित करावी.

६.६ संस्थेचा संपुर्ण पत्ता प्रकट होईल. संस्थेचे नाव व पत्ता बरोबर असल्याची खात्री करावी.




६.७ संस्था नोंदणी पूर्ण होईल व संस्था नोंदणी क्रमांक उपलब्ध करुन देण्यात येईल. संस्था नोंदणी क्रमांक व पासवर्ड संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीच्या प्राथमिक मोबाईल क्रमांकावर SMS व्दारे देखिल उपलब्ध करुन देण्यात येईल.




## ७ संस्था > संस्था लॉगिन/ Institute > Institute Login

७.१ नोंदणीकृत संस्थांना त्यांच्या खात्यात प्रवेश करण्यासाठी संस्था > संस्था लॉगिन वर क्लिक करावे.

७.२ संस्था नोंदणी क्रमांक, पासवर्ड व सांकेतांक नमुद करुन “लॉगिन” वर क्लिक करावे.




७.३ खालील प्रमाणे संस्थेचे खाते प्रकट होईल:




७.४ डॅशबोर्ड/ Dashboard: याव्दारे संस्थेस आपल्या खात्याच्या मुख्यपृष्ठावर येता येईल.

७.५ प्रोफाईल

७.५.१ प्रोफाईल संपादित करा/ Edit Profile: याव्दारे संस्थेस आपल्या नोंदणी अर्जातील माहितीत बदल करता येईल. तथापि, संस्थेने प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी जिल्हा प्रशासकांकडे बॅच अग्रेषित केल्यास प्रोफाईल मधील माहितीत बदल करता येणार नाही.

७.५.२ प्रोफाइल प्रिंट/ Print Profile: याव्दारे संस्थेस आपल्या नोंदणी अर्जाची छापिल प्रत उपलब्ध करुन घेता येईल

७.५.३ उमेदवार नोंदणी/ Candidate Registration: याव्दारे संस्थेस त्यांच्या विद्यार्थ्यांची नोंदणी करणे शक्य होईल.

७.६ बॅचेस/ Batches > नविन तुकडी तयार करणे, तुकडीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता जिल्हा प्रशासनास सादर करणे, प्रमाणपत्र डाऊनलोड करणे, इत्यादी कार्यवाही करणे.

७.७ उमेदवार/ Candidates: उमेदवारांचे प्रवेश निश्चित करणे, उमेदवारांची यादी तयार करणे, इत्यादी कार्यवाही करणे

७.८ नानविध > पासवर्ड बदला/ Miscellaneous > Change Password: संस्थेस पासवर्ड बदलता येईल

७.९ नोंदणी केलेले/ Applied: नोंदणीकृत उमेदवारांची संख्या ज्यांनी सदर संस्थेची निवड केली आहे.


७.१० प्रवेशित/ Admitted: ज्या नोंदणी केलेल्या उमेदवारांचे प्रवेश संस्थेने निश्चित केले आहे त्यांची संख्या

७.११ प्रमाणपत्रासाठी पाठवलेले/ Sent for Certification: ज्या उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे व त्यांचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी जिल्हा प्रशासकांकडे अग्रेषित करण्यात आले आहे त्यांची संख्या


७.१२ प्रमाणित/ Certified: ज्या उमेदवारांचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे त्यांची संख्या

## ८ नविन बॅच तयार करणे/ Create New Batch


८.१ सर्व प्रथम संस्थेने नविन बॅच तयार करावी. नविन बॅच तयार करण्यासाठी “बॅचेस” वर क्लिक करावे. त्यानंतर “नविन बॅच/ New Batch” वर क्लिक करावे.




८.२ नविन बॅच तयार होईल व त्या बॅचला बॅच क्रमांक बहाल करण्यात येईल. प्रशिक्षण सुरू होण्याचा दिनांक/ Training Start Date व प्रशिक्षण पूर्ण होण्याचा दिनांक/ Training End Date नमुद करावा व “Create Batch” वर क्लिक करावे.





८.३ खालिल प्रमाणे नविन बॅच तयार होईल. आवश्यक असल्यास संस्था वेगवेगळ्या कालावधीकरिता अतिरिक्त बॅचेस तयार करुन शकतात.




## ९ उमेदवारांचे प्रवेश निश्चित करणे/ Admit Candidates

९.१ संस्थेने तयार केलेल्या बॅचेस मध्ये नोंदणी केलेल्या उमेदवारांना प्रवेश देण्याकरिता उमेदवार > नोंदणी केलेले/ Candidates > Applied वर क्लिक करावे.



९.२ ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे व नोंदणी अर्जात संस्था निवडलेली आहे, अशा सर्व उमेदवारांची यादी खालील प्रमाणे प्रकट होईल. संस्थेने तयार केलेल्या बॅचेस ड्रॉप डाऊन मध्ये उपलब्ध होतील. त्यापैकी प्रवेश देण्यात येणारी बॅच निवडावी व प्रवेश निश्चित करण्याकरिता “Admit” वर क्लिक करावे.

**Applied Candidate List**

| Sr. No. | Profile ID | Candidate Name | Candidate Status | Batch | Training Period | Action |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 202306W166497 | Ms. DRASHANA SHIVLAL SONAWANE | Applied | MSBW10002/004 | 06/07/2023 - 09/07/2023 | Admit |
| 2. | 202306W166498 | Ms. MINAL MADHUKAR PATIL | Applied | MSBW10002/004 | 06/07/2023 - 09/07/2023 | Admit |

९.३ प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता अग्रेषित केलेल्या बॅचेस ड्रॉप डाऊन मध्ये उपलब्ध होणार नाहीत.

## १० प्रशिक्षण पूर्ण करुन प्रमाणपत्रासाठी बॅच अग्रेषित करणे

१०.१ प्रवेशीत युवतींचे प्रशिक्षणांती गुण नमुद करण्याकरिता “बॅचेस” वर क्लिक करावे. सर्व बॅचेसची यादी खाली प्रमाणे प्रकट होईल. संबंधीत बॅच समोर “Edit Profile” वर क्लिक करावे.

New Batch

| Sr. No. | Institute Code | Batch | Admitted | Training Start Date | Training End Date | Batch Status | Action |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | MSBW10002 | MSBW10002/002 | 0 | 01/07/2023 | 10/07/2023 | Created | Edit Batch |
| 2. | MSBW10002 | MSBW10002/001 | 1 | 03/07/2023 | 06/07/2023 | Created | Edit Batch |

१०.२ खालील प्रमाणे बॅचचा तपशिल व प्रवेशीत युवतींची यादी प्रकट होईल.

**Edit Batch Details**

Institute Name: JAIHIND COLLEGE

Batch No: MSBW10002/004

Training Start Date *: 06/07/2023 Training End Date *: 09/07/2023

Admitted: 2 Marks Uploaded: 0 Marks Uploading Pending: 2

| Sr. No. | Profile ID | Name | Candidate Status | Marks out of 100 | Action |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 202306W166497 | Ms. DRASHANA SHIVLAL SONAWANE | Admitted | 98 | Remove |
| 2. | 202306W166498 | Ms. MINAL MADHUKAR PATIL | Admitted | 98 | Remove |

Note: Remove absent candidates from Batch before sending Batch for Certification

Save as Draft | Send Batch for Certification | Close

१०.३ ज्या युवतींना प्रवेश देऊन ही त्यांनी प्रशिक्षण पूर्ण केलेले नाही, अशा युवतींना “Remove” व्दारे बॅच मधुन काढुन टाकण्यात यावे.

१०.४ तसेच ज्या युवतींनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे, त्यांच्या नावासमोर त्यांना प्रशिक्षणादरम्यान कामगिरीनुसार १०० पैकी गुण नमुद करावे.

१०.५ आवश्यक असल्यास प्रशिक्षण कालावधी देखिल अद्यावत करणे शक्य आहे.

१०.६ सदर बॅच मध्ये प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्व युवतींचे गुण नमुद करुन प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय यांना बॅच अग्रेषित कराण्याकरिता “Send Batch for Certification” वर क्लिक करावे. पुष्टी करण्याकरिता OTP नमुद करावा

१०.७ तथापि, बॅच अग्रेषित न करता केवळ माहिती सुरक्षीत करण्यासाठी “Save as Draft” वर क्लिक करावे

१०.८ प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता अग्रेषित करण्यात आलेली बॅचमध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत अथवा अशी बॅच परत बोलाविता येणार नाही.

## ११ प्रमाणपत्र download करणे

११.१ बॅचेस वर क्लिक करावे. खालील प्रमाणे संस्थेतील सर्व बॅचेस प्रकट होतिल

| Sr. No. | Institute Code | Batch | Admitted | Training Start Date | Training End Date | Batch Status | Action | Update Certificate Dispatch Status | Dispatch Date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | MSBW10002 | MSBW10002/004 | 2 | 06/07/2023 | 09/07/2023 | Created | Edit Batch | Not Dispatched | NA |
| 2. | MSBW10002 | MSBW10002/003 | 0 | 01/07/2023 | 10/07/2023 | Created | Edit Batch | Not Dispatched | NA |
| 3. | MSBW10002 | MSBW10002/002 | 1 | 01/07/2023 | 10/07/2023 | Created | Edit Batch | Not Dispatched | NA |
| 4. | MSBW10002 | MSBW10002/001 | 3 | 03/07/2023 | 06/07/2023 | Certificate Dispatched | View Batch | Dispatched | 01/08/2023 |

११.२ ज्या बॅचचे प्रमाणपत्र जिल्हा प्रशासकाकडुन निर्गमित करण्याकरिता मान्यता देण्यात आली आहे, त्या बॅचचे status "Certified" असे नमुद करण्यात येईल. तसेच ज्या बॅचकरिता महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाव्दारे छापिल प्रमाणपत्र संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास वितरित करण्यात आले आहे त्या बॅचचे status "Certificate Dispatched" असे नमुद करण्यात येईल व वितरित करण्यात आलेला दिनांक त्यापुढे नमुद असेल.

११.३ प्रमाणपत्र download करण्यासाठी "View Batch" वर क्लिक करावे. खालील प्रमाणे संबंधीत तुकडीतील सर्व उमेदवारांची यादी प्रकट होईल. संबंधीत उमेवार अथवा संपूर्ण तुकडीचे प्रमाणपत्र एकत्रित download करता येतील.

**View Batch**

Institute Name JAIHIND COLLEGE

Batch No MSBW10002/001 Batch Status Certificate Dispatched

Training Start Date 03/07/2023 Training End Date 06/07/2023

Admitted 3 | Marks Uploaded 3 | Marks Uploading Pending 0

| Sr. No. | Profile ID | Name | Candidate Status | Marks out of 100 | Certificate ☑ |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 202306W166492 | Ms. SHITAL RAJARAM PATIL | Certified | 92 | ☑ |
| 2. | 202306W166494 | Ms. LAXMI SADANAND DATE | Certified | 95 | ☑ |
| 3. | 202306W166496 | Ms. VAISHALI AJABRAO BORSE | Certified | 98 | ☑ |

Download Close

## १२ उमेदवारांची यादी

१२.१ नोंदणी केलेले/ Applied: नोंदणीकृत उमेदवार ज्यांनी सदर संस्थेची निवड केली आहे. उपरोक्त प्रमाणे नोंदणी केलेल्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित करण्याची सुविधा येथे उपलब्ध आहे.

१२.२ प्रवेशित/ Admitted: ज्या नोंदणी केलेल्या उमेदवारांचे प्रवेश संस्थेने निश्चित केले आहे त्यांची यादी. प्रवेश केलेल्या उमेदवारांना प्रवेशीत बॅच मधुन काढुन टाकण्याची सुविधा उपलब्ध आहे.

१२.३ प्रमाणपत्रासाठी पाठवलेले/ Sent for Certification: ज्या उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे व त्यांचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी जिल्हा प्रशासकांकडे अग्रेषित करण्यात आले आहे त्यांची यादी.

१२.४ प्रमाणित/ Certified नोंदणी केलेले/ Applied: ज्या उमेदवारांचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे त्यांची यादी. उमेदवारांचे प्रमाणपत्र डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

१२.४.१ जिल्हा प्रशासकांनी प्रमाणपत्र निर्गमित करण्यास मान्यता दिलेल्या व संबंधीत संस्थेतील सर्व तुकड्या dropdown मध्ये उपलब्ध आहेत. प्रमाणपत्र download करण्यासाठी तुकडी निवडावी


**☰ Certified Candidate List**

Batch :

Select

Download

१२.४.२ निवड केलेल्या तुकडीतील सर्व उमेदवारांची यादी प्रकट होईल. संबंधी उमेवार अथवा यादितिल सर्व उमेदवारांचे प्रमाणपत्र एकत्रित download करता येतील.



| Sr. No. | Profile ID | Candidate Name | Candidate Status | Batch | Training Period | Certificate |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 202306W166492 | Ms. SHITAL RAJARAM PATIL | Certified | MSBW10002/001 | 03/07/2023 - 06/07/2023 | ☑ |
| 2. | 202306W166494 | Ms. LAXMI SADANAND DATE | Certified | MSBW10002/001 | 03/07/2023 - 06/07/2023 | ☐ |
| 3. | 202306W166496 | Ms. VAISHALI AJABRAO BORSE | Certified | MSBW10002/001 | 03/07/2023 - 06/07/2023 | ☐ |

Previous 1 Next

Download


१२.४.३ महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाव्दारे छापिल प्रमाणपत्र संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत संबंधीत संस्थेस उपलब्ध करुन देण्यात येतील.

## जिल्हा प्रशासक/ District Admin

## १३ प्रथम लॉगिन करणे

१३.१ सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांना https://shakti.msbsvet.edu.in संकेतस्थळ वापरण्याकरिता User Id व Password उपलब्ध करुन देण्यात येत आहे. User ID व पासवर्ड प्राप्त करुन घेण्याकरिता श्री. धनाजी पवार यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ८२७५७ ६३२३५ वर संपर्क साधावा. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी त्यांच्या User Id व Password संबंधी गोपनीयता पाळावी.


१३.२ सर्व प्रथम लॉगिन केल्यावर Miscellaneous > Update Profile व्दारे भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल अद्यावत करावा. प्रमाणपत्र मान्यता व अन्य बाबींच्या पुष्टीकरिता येथे नोंद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावरच OTP उपलब्ध होईल.





## १४ खात्यात प्रवेश करणे

१४.१ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी त्यांच्या खात्यात प्रवेश करण्यासाठी जिल्हा प्रशासक/ District Admin वर क्लिक करावे.

१४.२ User Id, पासवर्ड व सांकेतांक नमुद करुन “लॉगिन” वर क्लिक करावे.




१४.३ खालील प्रमाणे जिल्हा प्रशासक यांचे खाते प्रकट होईल:



१४.४ डॅशबोर्ड/ Dashboard: याव्दारे आपल्या खात्याच्या मुख्यपृष्ठावर येता येईल.


१४.५ नोंदणी केलेले/ Applied: नोंदणीकृत उमेदवारांची संख्या ज्यांनी सदर संस्थेची निवड केली आहे.

१४.६ प्रवेशित/ Admitted: ज्या नोंदणी केलेल्या उमेदवारांचे प्रवेश संस्थेने निश्चित केले आहे त्यांची संख्या.

१४.७ प्रमाणपत्रासाठी पाठवलेले/ Sent for Certification: ज्या उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे व त्यांचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी जिल्हा प्रशासकांकडे अग्रेषित करण्यात आले आहे त्यांची संख्या

१४.८ प्रमाणित/ Certified: ज्या उमेदवारांचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे त्यांची संख्या


## १५ बॅचेस/ Batches:





१५.१ Created/ तयार केले: संस्थांव्दारे तयार केलेल्या सर्व तुकड्या येथे उपलब्ध आहेत.

## १६ प्रमाणपत्र निर्गमित करण्यास मान्यता देणे

१६.१ Received for Certification/ प्रमाणपत्रासाठी प्राप्त झाले: प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता संस्थांव्दारे सादर केलेल्या सर्व तुकड्या येथे उपलब्ध आहेत. तालुका व संस्थां निवडावी व Search Batch वर क्लिक करावे.





१६.२ खालील प्रमाणे प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता संस्थांव्दारे प्राप्त झालेल्या तुकड्यांची यादी प्रकट होईल




| Sr. No. | District | Taluka | InstituteName | Batch | Batch Status | Admitted | Training Start Date | Training End Date | Action |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Dhule | Shirpur | JAIHIND COLLEGE | MSBW10002/004 | Sent for Certification | 2 | 06/07/2023 | 09/07/2023 | View |
| 2. | Dhule | Shirpur | RCPIT | MSBW10003/001 | Sent for Certification | 1 | 01/07/2023 | 04/07/2023 | View |

१६.३ संबंधीत तुकडी मान्य करण्याकरिता View वर क्लिक करावे. खालील प्रमाणे संबंधीत तुकडीची माहिती व उमेदवारांची यादी प्रकट होईल.




| Sr. No. | Profile ID | Name | Candidate Status | Marks out of 100 |
|---|---|---|---|---|
| 1. | 202306W166497 | Ms. DRASHANA SHIVLAL SONAWANE | Sent for Certification | 95 |
| 2. | 202306W166498 | Ms. MINAL MADHUKAR PATIL | Sent for Certification | 92 |


१६.४ तुकडीची माहिती व उमेदवारांची यादी बरोबर असल्याची खात्री करुन Approve Certification वर क्लिक करावे. खालील प्रमाणे संदेश प्रकट होईल. प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता मान्यता दिल्यानंतर संबंधी तुकडी रद्द करणे अथवा प्रमाणपत्र रद्द करणे शक्य होणार नाही.





१६.५ जिल्हा प्रशासकांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनीवर पुष्टी करण्यासाठी OTP प्राप्त होईल. OTP नमुद करावा व Verify OTP वर क्लिक करावे. OTP बरोबर असल्यास संबंधीत तुकडीतील सर्व उमेदवारांचे प्रमाणपत्र निर्गमित होतिल.

## १७ प्रमाणपत्र download करणे

१७.१ Certified/ प्रमाणित: जिल्हा प्रशासनास देखिल संबंधीत जिल्ह्यातिल सर्व संस्थांचे प्रमाणपत्र Download करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याकरिता त्यांनी Batches > Certified/ बॅचेस > प्रमाणित वर क्लिक करावे




१७.२ संबंधीत संस्था निवडावी व Search Batch वर क्लिक करावे. प्रमाणपत्र निर्गमित केलेल्या तुकड्यांची यादी खालील प्रमाणे प्रकट होईल.


Excel PDF


Show 10 entries

Search:

| Sr. No. | District | Taluka | InstituteName | Batch | Batch Status | Admitted | Training Start Date | Training End Date | Action |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Dhule | Shirpur | JAIHIND COLLEGE | MSBW10002/001 | Certified | 3 | 03/07/2023 | 06/07/2023 | View |

Previous 1 Next

१७.३ संबंधीत तुकडी समोर View वर क्लिक करावे. खालील प्रमाणे तुकडीतील सर्व उमेदवारांची यादी प्रकट होईल. संबंधी उमेवार अथवा संपूर्ण तुकडीचे प्रमाणपत्र एकत्रित download करता येतील.


View Batch

Institute Name JAIHIND COLLEGE

Batch No MSBW10002/001

Training Start Date 03/07/2023 Training End Date 06/07/2023

Admitted 3 Marks Uploaded 3 Marks Uploading Pending 0

| Sr. No. | Profile ID | Name | Candidate Status | Marks out of 100 | Certificate |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 202306W166492 | Ms. SHITAL RAJARAM PATIL | Certified | 92 | ☑ |
| 2. | 202306W166494 | Ms. LAXMI SADANAND DATE | Certified | 95 | ☑ |
| 3. | 202306W166496 | Ms. VAISHALI AJABRAO BORSE | Certified | 98 | ☑ |

Download Certificate Close

१७.४ महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाव्दारे छापिल प्रमाणपत्र संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत संबंधीत संस्थेस उपलब्ध करुन देण्यात येतील.

## १८ छापिल प्रमाणपत्र वितरण स्थिती

१८.१ Certificate Dispatched/ प्रमाणपत्र पाठवले: ज्या बॅचकरिता महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाव्दारे छापिल प्रमाणपत्र संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास वितरित करण्यात आले आहे त्या बॅचचे प्रमाणपत्र “Certificate Dispatched” मध्ये खालील प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येतील.

| Sr. No. | District | Taluka | InstituteName | Batch | Batch Status | Admitted | Training Start Date | Training End Date | Action | Update Certificate Dispatch Status | Dispatch Date |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Dhule | Shirpur | JAIHIND COLLEGE | MSBW10002/001 | Certificate Dispatched | 3 | 03/07/2023 | 06/07/2023 | View | Dispatched | 01/08/2023 |
| 2. | Dhule | Dhule | SARASWATI EDUCATION SOCIETY | MSBW10010/001 | Certificate Dispatched | 1 | 03/07/2023 | 06/07/2023 | View | Dispatched | 02/08/2023 |

Previous 1 Next

१८.२ प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेला दिनांक त्यापुढे नमुद असेल.

१८.३ प्रमाणपत्र download करण्यासाठी “View” वर क्लिक करावे. खालील प्रमाणे संबंधीत तुकडीतील सर्व उमेदवारांची यादी प्रकट होईल. संबंधीत उमेवार अथवा संपूर्ण तुकडीचे प्रमाणपत्र एकत्रित download करता येतील.

## १९ उमेदवारांची यादी

१९.१ विविध टप्प्यांवरील उमेदवारांची माहिती प्राप्त करता येईल

१९.२ नोंदणी केलेले/ Applied: नोंदणीकृत उमेदवार ज्यांनी त्या जिल्ह्यातिल संस्थेची निवड केली आहे.


१९.३ प्रवेशित/ Admitted: ज्या नोंदणी केलेल्या उमेदवारांचे प्रवेश संस्थेने निश्चित केले आहे त्यांची यादी.

१९.४ प्रमाणपत्रासाठी पाठवलेले/ Sent for Certification: ज्या उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे व त्यांचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी जिल्हा प्रशासकांकडे अग्रेषित करण्यात आले आहे त्यांची यादी

१९.५ प्रमाणित/ Certified नोंदणी केलेले/ Applied: ज्या उमेदवारांचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे त्यांची यादी. उमेदवारांचे प्रमाणपत्र डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

## २० नानविध/ Miscellaneous

२०.१ प्रोफाईल संपादित करा/ Edit Profile: याव्दारे जिल्हा प्रशासकास भ्रमणध्वनी बदलने शक्य आहे. जिल्हा प्रशासकास नोंदणीकृत भ्रमणध्वनीवर OTP येत नसल्यास अथवा अन्य अधिकाऱ्यास अधिकार प्रदान करावयाचा असल्यास भ्रमणध्वनी बदलण्याची सुविधा देण्यात येत आहे.




२०.२ पासवर्ड बदला/ Change Password: याव्दारे पासवर्ड बदलता येईल

## इतर सुविधा

## २१ उमेदवार व संस्था पासवर्ड विसरल्यास करावयाची कार्यवाही/ Forgot Password


२१.१ उमेदवार व संस्था पासवर्ड विसरल्यास “इथे क्लिक करा” येथे क्लिक करावे.



२१.२ "Forgot Password" वर क्लिक करावे




२१.३ पासवर्ड पुनर्स्थापित करण्यासाठी खालील प्रमाणे दोन पर्याय उपलब्ध आहेत:




२१.४ सुरक्षा प्रश्नाच्या उत्तराच्या आधारे पासवर्ड पुनर्स्थापित करणे


२१.४.१ नोंदणी क्रमांक, सुरक्षा प्रश्न व सुरक्षा प्रश्नाचे उत्तर नमुद करावे व "पुढे जा" वर क्लिक करावे.




२१.४.२ उपरोक्त तिनही रकान्यातील माहिती बरोबर असल्यास नविन पासवर्ड तयार करण्याची सुविधा खालील प्रमाणे उपलब्ध असेल. नविन पासवर्ड व नवीन पासवर्डची पुष्टी करावी व "पासवर्ड बदला" वर क्लिक करावे.




२१.४.३ पासवर्ड यशस्वीरित्या बदलल्या गेल्यास खालील प्रमाणे संदेश प्रकट होईल.




२१.४.४ जर तिनही रक्कान्यातील माहितीत तफावत असल्यास खालील प्रमाणे त्रुटी संदर्भात संदेश प्रकट होईल.

Current Combination of Login ID, Security Question and it's Answer not matched. Please enter valid details.

२१.४.५ जर वापरकर्त्यास उपरोक्त प्रमाणे पासवर्ड पुनर्स्थापित करण्यास अडचण निर्माण झाल्यास खालील प्रमाणे One Time Password च्या माध्यमातुन पासवर्ड पुनर्स्थापित करण्याची कार्यवाही करावी.

२१.५ प्राथमिक मोबाईल क्रमांकावर One Time Password च्या आधारे पासवर्ड पुनर्स्थापित करणे - Using OTP sent via SMS to registered Mobile Number

२१.५.१ "Using OTP sent via SMS to registered Mobile Number" हा पर्याय निवडावा

२१.५.२ नोंदणी क्रमांक व प्राथमिक मोबाईल क्रमांक नमुद करावा व "पुढे जा" वर क्लिक करावे



२१.५.३ उपरोक्त दोन्ही रकान्यातिल माहिती बरोबर असल्यास प्राथमिक मोबाईल क्रमांकावर आलेला OTP नमुद करुन “Verify OTP” वर क्लिक करावे.

२१.५.४ OTP बरोबर असल्यास उपरोक्त प्रमाणेच नविन पासवर्ड तयार करण्याची सुविधा उपलब्ध असेल. नविन पासवर्ड व नवीन पासवर्डची पुष्टी करावी व “पासवर्ड बदला” वर क्लिक करावे.

२१.५.५ नोंदणी क्रमांक व प्राथमिक मोबाईल क्रमांकात तफावत असल्यास त्रृटी संदेश प्रकट होईल.

## २२ उमेदवार व संस्था नोंदणी क्रमांक विसरल्यास करावयाची कार्यवाही/ Forgot Profile ID

२२.१ उपरोक्त प्रमाण Forgot Profile ID वर क्लिक करावे





२२.२ उमेदवाराने संपूर्ण नाव व प्राथमिक मोबाईल क्रमांक व संस्था असल्यास अधिकृत प्रतिनिधीचे संपूर्ण नाव व त्यांचा प्राथमिक मोबाईल क्रमांक नमुद करुन “प्रोफाईल आयडी मिळवा” वर क्लिक करावे.




२२.३ उपरोक्त माहितीत तफावत असल्यास खालील प्रमाणे त्रृटी संदेश प्रकट होईल.





२२.४ उपरोक्त माहिती बरोबर असल्यास, प्राथमिक मोबाईल क्रमांकावर आलेला OTP नमुद करावा. OTP बरोबर असल्यास खालील प्रमाणे नोंदणी क्रमांक प्रकट होईल.





## २३ खात्याच्या बाहेर येणे/ Sign Out

२३.१ डॅशबोर्ड च्या वरच्या उजव्याबाजुला दिलेल्या फोटोखाली “Sign Out” बटन देण्यात आले आहे.




२३.२ “Sign Out” वर क्लिक केल्यास सर्व माहिती सुरक्षित/ Save करण्यासाठी संदेश प्रकट होईल व पुष्टी केल्यास खात्याच्या बाहेर येता येईल.



## राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम

संकेतस्थळ | उमेदवार नोंदणी | संस्था नोंदणी

**महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ**
४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी,
मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
https://msbsvet.edu.in ; msbve.secretary@dvet.gov.in ; ०८६५५९४४८५१/५२/५३